# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 16/11/2022 (बुधवार) दुपार


---

### घरफोडी

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :- अंतर्गत एमआयडीसी बोरी येथे दिनांक १५/०९/२०२२ ते ०६/११/२०२२ चे १५.०० वा. ते ११.०० वा. सुमारास यातील अज्ञात आरोपीने फिर्यादी नामे- किरण मनोहर बोबडे, वय ५६ वर्ष, रा. १३४, स्वामी कॉलनी, काटोल रोड, ता. जि. नागपुर याचे ए. आर. के. ॲग्रो इंडस्ट्री कंपनीतील १)फ्रुट मिल क्रशर, टु स्टेज पल्पर, रोटरी स्क्रूप पास्टराईझर, ०३ स्ट्रिम जॅकेटेड केटल २२५ लिटरचे, फिल्टर प्रेस, न्युमॅटीक पिस्टन फिलर, शिंक टनेल मशीन, क्राउनिंग मशीन, कॉम्प्रेशर, ०२ कॉम्प्युटर, ए. सी. १.५ टन, २ पल्प कलेकशन टॅक. असा एकुण किमती .७०,०००/- रूपयाचा मुद्‌देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन एमआयडीसी बोरी करीत आहे.

### दुखापत

**पो.स्टे. रामटेक** :- अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील बस आगर रामटेक येथे दिनांक १५/११/२०२२ चे १५.०० वा. सुमारास फिर्यादी नामे- पंकज युवराज नाईक, वय ४२ वर्ष, रा. विद्यासागर कॉलेज शितलवाडी रामटेक हा आगार येथे चालक या पदावर कार्यरत असून नमुद घटना वेळी व ठिकाणी यातील आरोपी डयूटी अधिकारी नामे- प्रभाकर प्रकाश कानफाडे, वय ३७ वर्ष, रा. कुंभारे कॉलोनी यांना भंडारा येथे लावलेली डयूटी चेंज करण्यास फिर्यादीने म्हटले असता या कारणा वरुन आरोपीने वाद करुन फिर्यादीचे डोक्यावर लाकडी खुर्ची उचलून मारुन जख्मी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३२४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन रामटेक करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**